
100 दिवसांची  कार्यालयीन सुधारणा विशेष मोहीम
मुद्रांक जिल्हाधिकारी
मुंबई शहर
मुद्रांक जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई

# 1. संकेतस्थळ


अ) वापरण्यातील सुलभता (User Friendly):- नोंदणी व मुद्रांक विभागाच्या www.igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर नागरीकांना ऑनलाईन सुविधांसह कार्यालयीन आवश्यक माहिती उपलब्ध आहे.

आ) माहितीचे अद्यावतीकरण (Updated Information) :- www.igrmaharashtra.gov.in या संकेस्थळावर माहिती सद्यास्थिती अद्यावत असुन ती अद्यावत ठेवली जाते व जाईल.

इ) माहिती अधिकार अधिनियम अंतर्गत माहितीचे स्वंयप्रकटीकरण (Proactive Disclosure under RTI Act) :- नोंदणी व मुदांक विभागच्या संकेतस्थळावर माहिती अधिकार अधिनियमांतर्गत माहितीचे स्वयंप्रकटीकरण करण्यात आलेले असून त्यासाठी संकेतस्थळावर विशेष टॅब द्वारे करण्यात आलेले आहे.

ई) सुरक्षितता (Data/Cyber Securities) :- नोंदणी व मुद्रांक विभागाचा कार्यालयीन कामकाजाचा तथा संकेत स्थळावरील विदा (Data) हा National Informatics Centre ( NIC) या भारत सरकारच्या अखत्यारीतील Ministry of Electronics and Information Technology (MeitY) या संस्थेमार्फत सुरक्षितपणे जतन करून ठेवला जातो.

उ) लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत सेवा अधिसुचित करुन ऑनालईन प्रसिध्द करणे :- महाराष्ट् लोकसेवा हक्क अधिनियम– 2015 च्या अनुषंगाने नोंदणी व मुद्रांक विभागाने एकुण 15 सेवा अधिसुचीत केलेल्या असून सदरच्या सेवा विभागाच्या संकेत स्थळावर ऑनलाईन उपलब्ध आहेत. तसेच, सदर सेवाबाबतच्या माहितीचा फलक या कार्यालयाच्या दर्शनी भागात लावण्यात आलेला आहे. एकूण- 15 सेवांपैकी दस्तांचे अभिनिर्णय करणे ही एक सेवा मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई या कार्यालयाशी संबधीत आहे.



# संकेतस्थळाचे छायाचित्र









# 2. सुकर जीवनमान (Ease of Living)

| सेवा | पूर्वीची स्थिती | सुलभीकरणानंतर झालेले बदल |
|---|---|---|
| अभिनिर्णय | ❖ अभिनिर्णय प्रकरणे मुल्यांकनाकरीता या कार्यालयात पूर्वी थेट सादर करण्यात येत होती. त्यावर कार्यवाही करताना या कार्यालयाकडून संबंधित पक्षकारांना मुद्रांक शुल्क भरण्यासाठी मागणी नोटीस अथवा अंतिम आदेश हे पोष्टाने किंवा प्रत्यक्ष कार्यालयात देण्यात येत होते. त्यामुळे पक्षकारांना एकाच प्रकरणात वारंवार कार्यालयात उपस्थित रहावे लागत होते. | ❖ या कारणास्तव नोंदणी व मुद्रांक विभागाने दि. 01/08/2022 या तारखेपासून अभिनिर्णय प्रकरणे ही ऑनलाईन पध्दतीने E-Adjudication module ही सेवा उपलब्ध करुन दिलेली आहे.<br>❖ नागरिकांनी मुद्रांक शुल्क भरणेसाठी आपले प्रकरण या कार्यालयात ऑनलाईन तसेच थेट सादर केल्यानंतर प्रकरणांमधील त्रुटींची अथवा प्रकरण कशासाठी प्रलंबित आहे याबाबतची माहिती संबंधितांना तात्काळ ऑनलाईन तसेच भ्रमणध्वनीवर अथवा ई मेल द्वारे कळविण्यात येत आहे.<br>❖ त्यामुळे कार्यालयीन कामाचा निपटारा वेळेत करणे शक्य झालेले असून पक्षकारांच्या अमुल्य वेळेची बचत होत असुन प्रकरण त्वरीत निकाली निघून शासनाच्या महसूलात वाढ झाली आहे . |

| सेवा | पूर्वीची स्थिती | सुलभीकरणानंतर झालेले बदल |
| --- | --- | --- |
| मुद्रांक शुल्क परतावा<br><br>( Refund) | ❖ मुद्रांक शुल्क परतावा प्रकरणे या पूर्वी कार्यालयात थेट सादर करण्यात येत होती. त्यावर कार्यावाही करताना कार्यालयाकडून पक्षकारांना त्रृटीपत्र अथवा परतावा मंजुरी आदेश हे पोष्टाने किंवा थेट देण्यात येत होता. त्यामुळे प्रत्यक्ष कार्यालयात देण्यात येत होते. त्यामुळे पक्षकारांना एकाच प्रकरणात वारंवार कार्यालयात उपस्थित रहावे लागत होते.<br>❖ तसेच पुर्वी परतावा मंजुरी आदेश झाल्यानंतर नमुना म.को.नि. 43 वरती पक्षकाराची स्वाक्षरी करीता कार्यालयात उपस्थित राहावे लागत होते. | ❖ पक्षकारांनी मुद्रांक शुल्काचा परतावा किंवा कोर्ट फीचा परतावा मिळणेसाठी प्रकरण दाखल केल्यानंतर प्रकरणाची सद्यस्थिती काय आहे? याबाबतची सविस्तर माहिती संबंधितांना भ्रमणध्वनीद्वारे तथा ई-मेलद्वारे कळविण्यात येत आहे. यामुळे पक्षकारांचा वेळेचा अपव्यय टाळला जात असून परतावा प्रकरणे लवकरात लवकर निकाली काढली जात आहे.<br><br>❖ परतावा मंजुरी आदेश झाल्यानंतर नमुना म.को.नि. 43 वर पक्षकाराची स्वाक्षरी न घेता अधिदान व लेखा कार्यालयात सादर केले जाते. त्यामुळे पक्षकारांचा वेळेचा अपव्यय टाळला जात असून परतावा रक्कम त्यांचा बॅक खातेमध्ये त्वरीत जमा होते. |

# 3. स्वच्छता

**अ) अभिलेख निंदणीकरण व वर्गीकरण:-** महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण- 2018/प्र.क्र.9/18 (र. व का.) दि. 15/02/2018 अन्वये नमूद केलेल्या कार्यपध्दतीच्या अनुषंगाने या कार्यालयाने कार्यालयीन अभिलेखांचे निंदणीकरण, वर्गीकरण केलेले असून सदर अभिलेख हा अ,ब,क व ड या वर्गीकरणनुसार अनुक्रमे लाल, हिरवा,पिवळा व पांढरा रंगाच्या कपडयात बांधून ठेवण्यात आलेला आहे.

**आ) मुदतबाहय अभिलेख नष्ट करणे :-** या कार्यालयाने सन 2006 ते 2011 पर्यंतचे मुदत बाहय अभिलेख हे कार्यालयाच्या आदेश क्र. जा.क्र/ निर्लेखन/ आदेश/ 2017-18/ 2490 दि.31/05/2017 अन्वये नष्ट केलेले असून त्यानंतर सन 2012 ते 2018 या कालावधितील मुदत बाहय अभिलेख नष्ट करण्याबाबतची कार्यवाही सुरू आहे. या कालावधीतील नष्ट करावयाच्या अभिलेखाच्या याद्या तयार करण्यात आलेल्या असुन मुदतबाह्य अभिलेख नष्ट करण्याकरीता मान्यता मिळण्यासाठी प्रस्ताव मा.अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई यांच्याकडे दि.28/04/2025 रोजी सादर करण्यात आलेला आहे. मा.अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई यांची मान्यता प्राप्त होताच नाशास पात्र असलेला अभिलेख या कार्यालयाकडून तात्काळ नष्ट करण्यात येईल.

**इ) जड वस्तु संग्रह नोंदवही अदययावतीकरण:-** कार्यालयातील जड वस्तूसंग्रह नोंदवही अद्यावत असून त्यात या कार्यालयास वेळोवेळी प्राप्त होणा-या वस्तुंची नोंद ठेवण्यात आलेली आहे.

**ई) जुन्या व निरुपयोगी वस्तुंची विल्हेवाट :-** जड वस्तूसंग्रह नोंदवही नुसार नमुद वस्तू सुस्थितीत असून कार्यालयास प्राप्त संगणकांची वेळोवळी योग्य पध्दतीने मेंटेन्नन्स ठेवण्यात येत आहे. कार्यालयात सद्यस्थितीत निरुपयोगी वस्तु नाहीत सबब, विल्हेवाट लावण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही. तथापि विल्हेवाटीची तजवीज ठेवलेली आहे.

**उ) जुन्या वाहनांचे निर्लेखन :-** या कार्यालयासाठी पुर्वीपासूनच वाहानाची व्यवस्था नसल्याने जुन्या वाहनांचे निर्लेखन करण्याबातचा विषय या कार्यालयास लागू नाही.



पुर्वीची स्थिती



नंतरची स्थिती

# 4. तक्रार निवारण

| अ.क्र | तक्रार प्रकार | प्राप्त प्रकरणे | निकाली प्रकरणे | शिल्लक प्रकरणे |
|---|---|---|---|---|
| अ) | आपले सरकार प्राप्त प्रकरणे | 2 | 2 | 0 |
| आ) | पी जी पोर्टल प्राप्त प्रकरणे | 0 | 0 | 0 |
| इ) | लोकशाही दिनामधील प्राप्त प्रकरणे | 1 | 1 | 0 |

**ई) अभ्यागत भेटीचे नियोजन व प्रसिध्दी फलक:-** अभ्यागतांसाठी भेटीची **वेळ दुपारी** 3 **ते** 5 अशी निश्चित करुन तसा फलक कार्यालयाचे दर्शनी भागात लावण्यात आलेला आहे व भेटीसाठी येणाऱ्या अभ्यागतांची नोंदवही ठेवण्यात आली आहे.

# 5. कार्यालयीन सोई सुविधा


| अ.क्र | निकष | कार्यवाही |
|---|---|---|
| अ) | कायमस्वरुपी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था | कायमस्वरुपी स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था उपलब्ध करण्यात आली आहे. |
| आ) | कर्मचारी व अभ्यागत यांचेसाठी स्वच्छ प्रसाधनगृहाची सुविधा | कर्मचारी व अभ्यागत यांचेसाठी स्वच्छ प्रसाधनगृहाची सुविधा उपलब्ध आहे. |
| इ) | महिला कर्मचारी व अभ्यागत यांच्यासाठी स्वतंत्र स्वच्छ प्रसाधनगृहाची सुविधा | महिला कर्मचारी व अभ्यागत यांच्यासाठी स्वतंत्र स्वच्छ प्रसाधनगृहाची सुविधा उपलब्ध आहे |
| ई) | अभ्यागतांसाठी सुसज्ज प्रतिक्षालय व्यवस्था | अभ्यागतांसाठी सुसज्ज प्रतिक्षालय व्यवस्था वाचनीय ग्रंथ व वर्तमान पत्रासह उपलब्ध करुन दिले आहेत. |
| उ) | कार्यालयामध्ये सुव्यवस्थित नामफलक, दिशादर्शक फलक लावणे व कार्यालयाचे सौंदर्यीकरण | कार्यालयामध्ये सुव्यवस्थित नामफलक, दिशादर्शक फलक लावलेले असून कार्यालयाचे सौंदर्यीकरण पूर्ण झालेले आहे. |




# ग्रंथालय











अभ्यागतांसाठी प्रतिक्षालय
व्यवस्था



अभ्यागतांसाठी प्रतिक्षालय
व्यवस्था




कार्यालय - मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई
२०१
श्री. अमित पटेल
सहाय्यक नगररचनाकार
(अ)
श्री. भूषण शेट्ये
पर्यवेक्षक
(ब)
श्री. प्रमोद खोटरे
लिपीक
(क)
श्रीम. मालिनी साळवे
पर्यवेक्षक



कार्यालय - मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई
२०३
श्री. राजेंद्र भालेराव
दुय्यम निबंधक श्रेणी - १
श्री. धानु सावंत
पर्यवेक्षक


कार्यालय - मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई
१. कार्यालयाची वेळ :-
सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ पर्यंत
२. टपाल स्विकारण्याची वेळ :-
सकाळी ११.०० ते सायं. ५.००
३. जेवणाची वेळ :-
दुपारी १.३० ते २.००
कार्यालय - मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई
२०२
श्री. शैलेश कलवार
लिपीक
श्री. प्रमोद खोटरे
लिपीक
श्रीम सिध्दी राणे
लिपीक


कार्यालय - मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई
सूचना का अधिकार
माहितीचा अधिकार अधिनियम, २००५
१
सहाय्यक जन माहिती अधिकाऱ्यांचे नांव
श्रीम. मालिनी साळवे
पर्यवेक्षक
२
जन माहिती अधिकाऱ्यांचे नांव
श्री. अमित पटेल
सहाय्यक नगररचनाकार
३
प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांचे नांव
श्री. कृष्णा जाधव
मुद्रांक जिल्हाधिकारी
★ कार्यालयाचा पत्ता ★
रुम नं. २०१ ते २०५, दुसरा मजला, जूने जकात घर, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४००००१

# मुद्रांक जिल्हाधिकारी यांचे कार्यालय





# 6. क्षेत्रीय कार्यालयांना भेटी


**अ) क्षेत्रीय कार्यालयांना भेटी (Visit to Regional Offices):-** मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई या कार्यालयाच्या अधिनस्त असलेल्या दुय्यम निबंधक कार्यालयांच्या तपासणी करीता वेळोवळी या कार्यालयाकडून तपासणी दौरे आयोजीत केले जातात. यात प्रामुख्याने अधिनस्त कार्यालयाकडून नोंदणी होत असलेल्या दस्तांवर महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमाच्या अंतर्गत आवश्यक मुद्रांक शुल्कांची वसूली संबधीत कार्यालये योग्यरितीने करत आहेत अथवा नाही हे तपासून त्याद्वारे शासनाच्या महसूलाची हानी टाळावी व महसूल वाढावा हा मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई या कार्यालयाचा मूख्य हेतू आहे.

**आ) केंद्र आणि राज्य शासनाच्या महत्वाच्या कार्यक्रमास/प्रकल्पास भेट देणे अथवा त्याची अंमलबजावणी व पर्यवेक्षण करणे या बाबी मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई या कार्यालयास लागू नाहीत.**

**इ) क्षेत्रीय कार्यालयांच्या भेटी ह्या प्रामुख्याने अधिनस्त असलेल्या दुय्यम निबंधक कार्यालयांशी संबंधीत असल्याने ग्रामपंचायत, शाळा, अंगणवाडी इ. विषय या कार्यालयास लागू नाहीत.**

# 7. ई-ऑफिस प्रणाली

- ई-ऑफिस प्रणाली कार्यरत करण्याबाबतची कार्यवाही पूर्ण झालेली असून अधिकारी तथा कर्मचारी यांचे ई-ऑफिस प्रणालीसाठी आवश्यक ई मेल आयडी शासनाकडून उपलब्ध करुन घेण्यात आलेले आहेत. ई-ऑफिस प्रणालीसाठी आवश्यक असणारे प्रशिक्षण प्रकल्प अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई यांच्या मार्फत घेण्यात आलेले असून दि.02/05/2025 या तारखेपासून हे कार्यालय ई-ऑफिस प्रणालीद्वारे कामकाज करण्यास सुरवात करेल.
- या कार्यालयाची रचना प्रामुख्याने खालील प्रमाणे आहे.



# 8. आर्थिक व औद्योगिक गुंतवणुकीस प्रोत्साहन

**अ) गुंतवणूकदार उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी पोषक वातावरण तयार करणे:-** गुंतवणूकदार व उद्योजकांना अभिनिर्णयाच्या सेवा Online आणि तातडीने उपलब्ध करुन देण्यात येतात. त्यांचा वेळ व श्रम वाचावेत हेच त्यामागील उदिष्ट असल्याने महाष्ट्रातील सर्वाधिक वसूली याच कार्यालयाकडून सेवातत्परतेमुळे झाल्याचे दिसुन येते.

**आ) व्यापारी /कामगार वर्गाच्या संघटनांशी चर्चा करुन त्यांच्या अडचणी सोडविणे :-** सदर बाब लागू नाही

**इ) गुंतवणूकदार उद्योजकांच्या अडचणीचे निकारण करणे :-** गुंतवणूकदार व उद्योजकांच्या विशेषत: IT उद्योजक/विकासक यांच्या अभिनिर्णयाच्या प्रकरणातील त्रुटींची पुर्तता तात्काळ करुन घेउन कार्यवाही पुर्ण केली जाते.

**ई) गुंतवणूकदार उद्योजकांसाठी प्रक्रियेचे सुलभीकरण करणे :-** नोंदणी व मुद्रांक विभागाच्या www.igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर गुंतवणूकदार उद्योजकांसाठी प्रक्रियेचे सुलभीकरणाच्या उद्देशाने ऑनलाईन सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

# Ease of Doing Business अंतर्गत विविध ऑनलाईन माहिती

Ease of Doing Business

← मागील पृष्ठ

| Sr. No | Description | Information / Link |
|---|---|---|
| 1 | **About Registration & Stamps Dept. Maharashtra** | |
| 1.1 | FAQs Related to Registration process/ department | Click Here |
| 1.2 | Citizen Charter | Click Here |
| 1.3 | Procedures under 'Registering Property' indicator | Click Here |
| 1.4 | Post a Grievance | |
| a) | IGR Grievance Redressal System | Click Here |
| b) | SARATHI Call Center : +91- 8888007777 (07 am to 09 pm on all days) | Email:complaint[at]igrmaharashtra[dot]gov[dot]in |
| 2 | **Check Property Details (Title Verification)** | |
| 2.1 | Conduct a title search at the office of Sub-Registrar | |
| a) | Free Search to view Index II for all registered documents (1985 onwards) | Free eSearch Portal |
| b) | Paid Search to conduct title search along with copy of document since 1985 | Paid eSearch Portal |
| 2.2 | Search of Record of Registration (RoR) Property Card | |
| a) | Property Card | Click Here |
| b) | Digitally Signed 7/12 and property Card | Click Here |
| 2.3 | Viewing the map for desired survey number | Click Here |
| 2.4 | Check Non-Encumbrance | |
| a) | Ensure that property is clear of all local tax dues (Mumbai) | MCGM Property Tax |

## 9. अधिकारी कर्मचारी प्रशिक्षण, सेवा विषयक बाबी आणि कृत्रीम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI)

| अक्र. | निकष | कार्यवाही |
|---|---|---|
| अ) | नव्याने सेवेत प्रविष्ट अधिकारी/कर्मचारी यांना प्रशिक्षित करणे | या कार्यालयात नव्याने सेवेत प्रविष्ठ अधिकारी/कर्मचारी नाहीत |
| आ) | सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे गोपनीय अहवाल लिहिणे (31 मार्च 2024 पर्यंतचे) | गोपनीय अहवाल (2024-2025) विहीत वेळेत सादर करण्यात आलेले आहेत. |
| इ) | सेवाज्येष्ठता यादया प्रसिध्द करणे व पदोन्नत्या करणे | सदरची बाब या कार्यालयास लागू नाही |
| ई) | न्यायालयीन प्रकरणे, विभागीय चौकशी प्रकरणे यांचा निपटारा करणे | न्यायालयीन अथवा विभागीय चौकशीचे एकही प्रकरण प्रलंबित नाही. |

| अक्र. | निकष | कार्यवाही |
|---|---|---|
| उ) | कार्यालयातील कामकाज अचूक होण्यासाठी प्रत्यक्ष कृत्रीम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर (AI) सुरु करणे | ❖ कार्यालयातील कामकाज अचूक होण्यासाठी प्रत्यक्ष कृत्रीम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे अनुषंगाने या कार्यालयाने अभिलेख कक्षाचे आधुनिकीकरण करण्यासाठी प्रशासकीय मान्यता व अनुदान मिळणेसाठी मा. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयास प्रस्ताव सादर केलेला आहे. या कार्यालयाचे पत्र क्र. 1056/2025 दिनांक 17/02/2025 अन्वये प्रशासकीय मान्यता व अनुदान प्राप्त होताच त्वरीत काम सुरु करण्यात येईल.<br><br>❖ सॉफ्टवेअर चा वापर करुन प्राप्त दस्ताचे बाजार मुल्यांकन AI च्या मदतीने तयार करण्यासाठी प्रयत्न करण्यात येउुन एक सॉफ्टवेअर विकसीत करण्यात आले आहे. त्याचा प्रायोगिक तत्वावर वापर 2 मे 2025 पासुन सुरू करण्यात येणार आहे. यामुळे अचुक, बिनचुक बाजारमुल्य काढण्यास मदत होईल. मानवी चुका टाळल्या जातील अशी अपेक्षा आहे. |

# 10. नाविन्यपूर्ण उपक्रम 2 – कार्यालयीन व्यवस्थापन सुधारणा

- ❖ कार्यालयातील कामकाज अचूक होण्यासाठी प्रत्यक्ष कृत्रीम बुध्दीमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे अनुषंगाने या कार्यालयाने अभिलेख कक्षाचे आधुनिकीकरण करण्यासाठी प्रशासकीय मान्यता व अनुदान मिळणेसाठी मा. नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयास प्रस्ताव सादर केलेला आहे. या कार्यालयाचे पत्र क्र. 1056/2025 दिनांक 17/02/2025 अन्वये प्रशासकीय मान्यता व अनुदान प्राप्त होताच त्वरीत काम सुरु करण्यात येईल.

- ❖ सॉफ्टवेअर चा वापर करुन प्राप्त दस्ताचे बाजार मुल्यांकन AI च्या मदतीने तयार करण्यासाठी प्रयत्न करण्यात येउन एक सॉफ्टवेअर विकसीत करण्यात आले आहे. त्याचा प्रायोगिक तत्वावर वापर 2 मे 2025 पासुन सुरू करण्यात येणार आहे. यामुळे अचुक, बिनचुक बाजारमुल्य काढण्यास मदत होईल. मानवी चुका टाळल्या जातील अशी अपेक्षा आहे.

- ❖ Ease of Doing Business अंतर्गत देशी तथा परदेशी गुंतवणूकदार यांच्या व्यवहारांच्यां दस्तास प्राधान्य देण्यात येते जणेकरुन शासनाच्या महसूलात मुद्रांक शुल्क वसुलीद्वारे मोठ्याप्रमाणत वृध्दी होऊ शकते.

- ❖ दिव्यांग / जेष्ठ नागरिक / महिला यांनी मुद्रांक शुल्क भरणेसाठी दाखल केलेली प्रकरणे किंवा मुद्रांक शुल्क / कोर्ट फी परतावा प्रकरणामध्ये प्राधान्य देण्याबाबतचा उपक्रम या कार्यालयाकडून राबविण्यात येणार आहे. तसे फलक या कार्यालयाचे दर्शनीभागात लावण्यात येणार आहे.




कार्यालय - मुद्रांक जिल्हाधिकारी, मुंबई
धन्यवाद